स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- १ मार्च, २०२३

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारे आयोजित परीसर मुलाखतीमध्ये सात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठीय केमिकल टेक्नालॉजी संस्था व एसएसबीटी आभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी येथील विद्यार्थ्यांसाठी सुप्रिम पेट्रोकेम लि. आमदोशी, रायगड ह्या कंपनीतर्फे आयोजित मुलाखतीमध्ये विद्यापीठीय केमिकल टेक्नालॉजी संस्थेच्या प्रज्वल पिसुदे, शाश्वत सहस्त्रबुध्दे, अभिषेक आंबेकर, आनंद पाटील, आदेश पवार, मयुर राजपूत तर एसएसबीटी आभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अमोलकुमार ठाकूर या सात विद्यार्थ्यांची वार्षिक चार लाख वेतनावर निवड करण्यात आली. या मुलाखती घेण्यासाठी कंपनीचे जीएम प्रोडक्शन ए. एम. परांजपे, ए. के. मेटांगळे उपव्यवस्थापक एच.आर, ओ. व्ही. खानापुरे उपव्यवस्थापक टेक्नीकल, ए. डी. पेडणेकर सहायक एच.आर हे उपस्थित होते. या परीसर मुलाखतीमध्ये २५ विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा व तदनंतर मुलाखती घेण्यात आल्या. कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळा संचालक प्रा. जे.बी. नाईक यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या मुलाखतीचे व्यवस्थापन समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले.

## बातमी क्र २

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र राज्य यांच्या सहय्याने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन २७ व २८ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला.

या दोन दिवशीय कार्यक्रमात दि.२७ रोजी प्रा. डी.एस. भारंबे जळगाव यांचे प्रयोगातून विज्ञान या विषयावर विविध प्रात्याक्षिकांसह व्याख्यान झाले. प्रास्ताविक प्रशाळेचे संचालक प्रा. डी. एस. पाटील यांनी तर समन्वयक म्हणून डॉ. संजय घोष यांनी काम पाहिले. दुस-या सत्रात उद्योजक कमलेश जोशी पुणे यांनी व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान दिले. दुपार सत्रात पोस्टर्स स्पर्धा व वकृत्व स्पर्धा घेण्यात आली.

दि. २८ रोजी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. दुपारच्या सत्रात बंगळूरू येथील ब्रिटीश टेलीकॉमच्या सायली पाटील यांनी कॉर्पोरेटमध्ये करीअर या विषयावर मार्गदर्शन करून मुलाखत कौशल्यावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी डॉ.जसपाल बंगे यांनी परीश्रम घेतले. यावेळी प्रशाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी संशोधक विद्यार्थी हे उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता